# घटक १ : प्राचीन कविता

## तुकारामाचे अभंग — तुकाराम

अनुक्रमणिका


**१.० उद्दिष्टे**

**१.१ प्रास्ताविक**

**१.२ शब्दार्थ, वाक्प्रचार आणि टीपा**

**१.३ अभंगांचे अध्ययन**

- १.३.१ पहिल्या अभंगाचे अध्ययन
- १.३.२ दुसऱ्या अभंगाचे अध्ययन
- १.३.३ तिसऱ्या अभंगाचे अध्ययन
- १.३.४ चौथ्या अभंगाचे अध्ययन.
- १.३.५ पाचव्या अभंगाचे अध्ययन.

**१.४ नमुना उत्तरे**

**१.५ अधिक अध्ययन**

- १.५.१ तुका झालासे कळस.
- १.५.२ तुकारामांचा परिचय.
- १.५.२ तुकारामांची शैली – काही विशेष.
- १.५.४ अभंग आणि ओवी
- १.५.५ गीतांजली आणि तुकारामांचे अभंग.

**१.६ सारांश**

**१.७ सरावासाठी स्वाध्याय**

**१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके**

## १.० उद्दिष्टे

संतकाव्याचा परिचय व्हावा, संतकाव्याचे स्वरूप तुम्हांला समजून घेता यावे, या दृष्टीने येथे तुकाराम महाराजांचे पाच अभंग निवडून घेतलेले आहेत.

या अभंगांचा अभ्यास केल्यानंतर तुम्हांस –

(अ) संत म्हणजे काय ते समजेल,

(आ) संत आणि सृष्टी यांच्यातील नात्याची ओळख होईल

(इ) देव आणि भक्त यांच्यातील प्रेमाचे स्वरूप ध्यानी येईल

(ई) संतांची प्राणिमात्रासंबंधी काय भावना असते याची ओळख नीटपणे होईल

(उ) संतांच्या जीवनाचा हेतू काय आहे ते समजून घेणे शक्य होईल

(ऊ) संत तुकारामांच्या अभंगाचे काव्यरूप कळून येईल.

## १.१ प्रास्ताविक

तुकाराम महाराज आपल्या जीवनातले अनुभव आपल्या अभंगांतून व्यक्त करतात. त्यातून त्यांची भावभक्ती प्रकट होते, तसेच काही विचारही प्रकट होतात. स्वतःची अनुभूती उत्कटपणे व्यक्त करणारी कविता ही भावकवितेच्या रूपाची असते. तुकारामांचे अभंगाचे स्वरूप भावकवितेचे आहे.

संत म्हणजे सज्जन. पण 'संत' या शब्दाला विशिष्ट अर्थ आहे. ईश्वराच्या चरणी लीन झालेला, त्याच्या भक्तीत रममाण झालेला, त्याला सर्वस्वार्पण करणारा सज्जन म्हणजे संत. सर्व प्राणिमात्रावर प्रेम करणारा आणि त्यांचे सदैव कल्याण इच्छिणारा संत-महात्मा स्वतःबद्दल बोलू लागला तरी ते बोलणे विश्वकल्याणाचेच असते. अशा संतकवितेचा आपणांस परिचय करून घ्यायचा आहे.

## १.२ शब्दार्थ, वाक्प्रचार आणि टीपा

**कंथा-कमंडलू** – कंथा म्हणजे गोधडी, कमंडलू म्हणजे पाणी पिण्याचे भांडे. ते विशिष्ट आकाराचे असते. हे भांडे विरागी, संन्यासी पुरुषाजवळ असते.

**देह-उपचारा** – देहाच्या म्हणजे शरीराच्या उपचारासाठी, गरजेसाठी, सोयीसाठी.

**परवडी** – भोजनातले भाजी, लोणचे इत्यादी रुचकर पदार्थ, आवड, चातुर्य, असाही याचा अर्थ आहे.

**सबाह्य** – अंतर्बाह्य, आतून आणि बाहेरून.

**आपंगिता** – सांभाळणारा, त्राता.

**वानणे (वाणणे)** – वर्णन करणे, स्तुती करणे.

**पराविया सुखे** – पर म्हणजे दुसरा, दुसऱ्याच्या सुखाने.

**उच्छिष्ट** – उष्टे. भक्तजन आपल्या देवाचे, गुरूंचे आणि संतांचे उच्छिष्ट कृपाप्रसाद म्हणून सेवन करतात.

**वैकुंठ** – विष्णुलोक. वैष्णवजन म्हणजे संतजन हे श्रीविष्णूच्या लोकातून पृथ्वीवर अवतरतात आणि शेवटी पुन्हा विष्णुलोकी जातात.

**सत्यभावे** – सत्य म्हणजे खरा, खऱ्या भावनेने.

**शब्दज्ञान** – केवळ शाब्दिक अर्थ, वाच्यार्थ, शब्दातून व्यक्त होणारा भावार्थ नव्हे.

**विषयलोभी मने** – विषय म्हणजे भोग्यवस्तू. ज्ञानेंद्रियांनी ज्यांचा उपभोग घेता येतो त्या गोष्टी – फूल, फळ इत्यादी. यांचा लोभ, मोह असणारे मन.

**डांगोरा पिटणे** – दवंडी पिटणे.

**कलिकाळ** – कली आणि काळ. कली ही कलह माजवणारी देवता, पाप माजविणारी देवता. कलियुग म्हणजे या देवतेचे युग. चार युगांपैकी शेवटचे युग.
काळ म्हणजे मृत्यू.
'कलिकाळ' या शब्दाचा एकंदरीत 'मृत्यू' असाही अर्थ घेतला जातो.

**कलिकाळासी दरारा** – पापाचा नाश करणे आणि मृत्यूलाही दहशत घालणे; असा धाक असणे.

**जाणवितो वारा अवस्वरू** – अवस्वर म्हणजे वेळ. वारा वेळेची जाणीव करून देतो, असा एक अर्थ. अवस्वर म्हणजे अवसर, अवकाश. वारा अवकाशाची जाणीव करून देतो, असा दुसरा अर्थ.

**साधने बुडविली** – मोक्ष-मुक्ती मिळविण्याचे मार्ग नष्ट केले. संतांनी 'भक्ती' हा मोक्ष मिळविण्याचा मार्ग म्हणून सांगितला व स्वतः आचरणात आणला. हा भक्तिमार्गच विषयलोभी माणसांनी आणि शब्दपंडितांनी नष्ट केला.

## १.३ अभंगांचे अध्ययन

आता तुम्हांला तुकाराम महाराजांच्या अभंगांचे सूक्ष्म अध्ययन करावयाचे आहे. त्यासाठी आपण एकेक अभंग घेऊ. प्रत्येक अभंगाखाली प्रश्न दिले आहेत. त्याची उत्तरे तुम्हांस देता येतील. अध्ययन संपल्यावर तुम्ही आपली उत्तरे सुचविलेल्या नमुना-उत्तरांशी पडताळून पाहा.

आता पुढील अभंग वाचा.

### १.३.१ पहिल्या अभंगाचे अध्ययन

१

वृक्ष वल्ली आम्हा सोयरी वनचरे । पक्षीही सुस्वरे आळवीती
येणे सुखे रुचे एकांताचा वास । नाही गुण दोष अंगा येत
आकाश मंडप पृथिवी आसन । रमे तेथे मन क्रीडा करी
कंथाकमंडलु देह उपचारा । जाणवितो वारा अवसरु
हरिकथा भोजन परवडी विस्तार । करोनि प्रकार सेवू रुची
तुका म्हणे होय मनासी संवाद । आपलाचि वाद आपणासी

तुकाराम महाराज घरदार सोडून, गावाबाहेरील डोंगरावर एकटेच राहिले आहेत. हा एकान्ताचा वास त्यांना फार सुख देत आहे. तुकाराम महाराजांनी हे सुख कसे सांगितले आहे ते पाहा– या एकान्तातही त्यांना सोयरे आहेत. पुढील चरण पाहा–

१. वृक्ष वल्ली आम्हा सोयरी वनचरे
२. वनचरेही (सोयरीच आहेत)
३. पक्षीही (सोयरीच आहेत) ते गोड आवाजात गातात

आपल्या कुटुंबातील, संसारातील सोयऱ्यांहूनही ही सोयरी अधिक सुखकर आहेत. का? तुकाराम म्हणतात–

'नाही गुण-दोष अंगा येत'....

पशु-पक्षी, वृक्ष-वल्ली आपली निंदा-स्तुती करीत नाहीत. ते गोड गातात, सावली देतात.

तुकाराम राहतात ते घर केवढे आहे?

'आकाश मंडप पृथिवी आसन'...

हे घर अनंत आणि अमर्याद आहे.

या घरावर कोणाची सत्ता आहे का?

'रमे तेथे मन क्रीडा करी'...

मनाला वाटेल तेथे जाण्याचे व खेळण्याचे स्वातंत्र्य आहे.

मग तुकाराम महाराजांचे ऐश्वर्य प्रचंड असेल?

'कंथा कमंडलु देह उपचारा'...

तुकारामांची संपत्ती वेगळीच आहे. एक गोधडी अंथरायला आणि एक भोपळ्याचे भांडे पाणी प्यायला. काही नसणे म्हणजेच सर्व असणे. वैराग्य हेच वैभव.

'हरिकथा भोजन परवडी विस्तार करोनि प्रकार सेवू रुची'

तुकाराम म्हणतात, ''आम्ही भोजन करतो ते हरिकथेचे. तेच ते खाण्याने वीट येतो. पण आम्ही आमच्या कौशल्याने तीत विविधता आणतो. हरिकथा एकच असली तरी ती अनेक प्रकारांत आम्ही सेवन करतो.

एकान्तात तुकाराम महाराज कोणाशी बोलणार? वृक्षांशी? वेलींशी? पशुपक्ष्यांशी? वाऱ्याशी? आकाशाशी? नाही. मग ते संवाद करतात आणि वादही घालतात, तो कोणाशी?

'तुका म्हणजे होय मनासी संवाद । आपलाचि वाद आपणाशी'

येथे बोलायचे ते स्वतःशी आणि भांडायचे ते स्वतःशी! जगाशी काही संबंध नाही. संबंध आहे तो आपला आपल्याशी! आपल्यातील जे चांगले आहे त्याच्याशी प्रेमाने बोलायचे, जे वाईट आहे त्याला टाकून बोलायचे, झिडकारून द्यायचे. असा हा स्वतःच्या मनाशी चालणारा संवाद-वाद आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(क) **रिकाम्या जागा भरा**

१. तुकारामांची ......... ही सोयरी-धायरी होत.

२. तुकारामांना आकाश हा .......... वाटे आणि पृथ्वी ......... वाटे.

३. देहाच्या गरजेसाठी तुकारामांजवळ .......... .......... असत.

(ख) **पुढील वाक्ये पूर्ण करा.**

१. तुकाराम महाराज एकाच एका हरिकथेचे भोजन करीत, पण..........

२. तुकाराम महाराज स्वतःच्या मनाशी संवाद करीत, वाद घालत, म्हणजे .............

३. तुकारामांना एकान्तवास आवडत असे कारण............

१. ..........................................................................................................

२. ..........................................................................................................

३. ..........................................................................................................

## १.३.२ दुसऱ्या अभंगाचे अध्ययन

२

पतिव्रता नेणे आणिकांची स्तुती । सर्वभावे पति ध्यानी मनी!
तैसे माझे मन एकविध जाले । नावडे विठ्ठलेविणे दुजे!
सूर्यविकासिनी नेघे चंद्रकळा । गाय ते कोकिळा वसंतेसी
तुका म्हणे बाळ मातेपुढे नाचे । बोल आणिकांचे नावडती

तुकारामांना श्रीविठ्ठल आवडतो. विठ्ठलाशिवाय दुसरा कोणी आवडत नाही. अशा या भक्तीला '**अनन्यभक्ती**' म्हणतात. (अन् = नाही, अन्य = दुसरा, भक्ती = आत्यंतिक प्रेम) तुकारामांनी यालाच 'माझे मन एकावेध झाले' असे म्हटले आहे. एके ठिकाणी जडून राहिले आहे असे म्हटले आहे. आपली ही विठ्ठलावरची अनन्यभक्ती तुकारामांनी पुढीलपणे स्पष्ट केली आहे.

पतिव्रतेच्या ध्यानी-मनी सदैव तिचा पती असतो. सर्वभावे ती त्याचीच झालेली असते. ती दुसऱ्या कोणाची स्तुती जाणतही नाही. तसे तुकारामांचे श्रीविठ्ठलाबाबत आहे. असे उदाहरण देऊन, दाखला देऊन बोलणे याला 'दृष्टान्त' अलंकार म्हणतात.

या अभंगात आणखी दोन दृष्टान्त आलेले आहेत.
(१) 'सूर्यविकासिनी नेघे चंद्रकळी'
सूर्यकिरणांनी उमलणारे कमळाचे फूल चंद्रकलेचा स्वीकार करीत नाही.

(२) 'गाय ते कोकिळा वसंतेसी'
कोकिळा वसंतऋतूतच गाते, दुसऱ्या कोणत्याही ऋतूत नाही.

(३) 'बाळ मातेपुढे नाचे, बोल आणिकांचे नावडती'
बाळ आईपुढे आनंदाने नाचते, इतरांचे कौतुकाचे बोलही त्याला आवडत नाहीत.

दृष्टान्ताने भावना किंवा विचार नुसता स्पष्ट होतो असे नाही, तर तो मनावर ठसतो, बिंबतो. येथे आणखी एक प्रतिपादनाची पद्धती ध्यानी घेण्यासारखी आहे.

(१) मला विठ्ठल आवडतो,
(२) विठ्ठावीण दुजे आवडत नाही...
हया पद्धतीला अन्वय-व्यतिरेकी पद्धती म्हणतात.
उदा. 'खरे बोलावे, खोटे बोलू नये.'

तुकाराम महाराज आपली विठ्ठलावरील अनन्यभक्ती किती परिणामकारकपणे व्यक्त करतात ते पाहण्यासारखे आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(ग) 'तुकारामांचे मन विठ्ठलाशिवाय दुसऱ्या कुणाचाही विचार करीत नाही' हा आशय स्पष्ट करण्यासाठी कोणते दोन दृष्टान्त या अभंगात आढळतात?

| |
|---|
| १ |
| २ |

(घ) तुकारामांनी दृष्टान्ताची योजना का केली आहे?

---

---

## १.३.३ तिसऱ्या अभंगाचे अध्ययन.

३

जे का रंजले गांजले । त्यांसि म्हणे जो आपुले
तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा
मृदु सबाहय नवनीत । तैसे सज्जनांचे चित्त
ज्यासि आपंगिता नाही । त्यासी धरी जो हृदयी
दया करणे जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी
तुका म्हणे सांगू किती । तोचि भगवंताची मूर्ती.

तुकाराम महाराज या अभंगात सज्जनांचे, साधु-संतांचे अंतःकरण कसे असते. साधू कसा ओळखावा ते सांगतात.

'भूतदया' हा संत-सज्जनांचा हृदयधर्म होय. व्यवहारी माणसे दया दाखवीत नाहीत असे नाही; पण त्यातही कीर्ती, प्रतिष्ठा यांचा विचार ते करतात. निरपेक्ष दया हा सज्जनांचा धर्म होय. तुकाराम म्हणतात—

(१) 'जे का रंजले गांजले, त्यांसि म्हणे जो आपुले...'
(२) 'ज्यासी आपंगिता नाही, त्यासी धरी जो हृदयी...'

तो 'साधू' म्हणून ओळखावा. ही विशुद्ध दया, हे निरपेक्ष मानवप्रेम, ही परमेश्वरी भावना!

या भावनेत आप-पर-भेद नसतो. समदृष्टी असते. तुकाराम म्हणतात —

(१) 'दया करणे जे पुत्रासी, तेचि दासा आणि दासी...'

सज्जनाचे मन हे दुःख, दैन्य, वेदना पाहताच लगेच द्रवते व तेथे स्वभावतःच धाव घेते. तुकाराम म्हणतात —

(१) 'मृदु सबाहय नवनीत । तैसे सज्जनांचे चित्त'

परमेश्वराला सर्व प्राणिमात्र सारखेच.. त्याची सर्वांवर सारखीच माया. संत-सज्जन हे मानवरूपातले प्रत्यक्ष देवच. तुकाराम म्हणतात —

(१) 'तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा'
(२) 'तुका म्हणे सांगू किती । तोचि भगवंताची मूर्ती'

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(ङ) पुढील प्रश्नांची उत्तरे द्या

(१) 'देव तेथेचि जाणावा'. 'तेथेचि' म्हणजे कोठे?
(२) सज्जनाचे चित्त कशाप्रमाणे असते?
(३) 'तोचि भगवंताची मूर्ती'. 'तोचि' म्हणजे कोण?

(च) तुकारामांनी साधूंची कोणती लक्षणे सांगितली आहेत?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

## १.३.४ चौथ्या अभंगाचे अध्ययन

४

काय वाणू आता न पुरे हे वाणी,
मस्तक चरणीं ठेवीतसे,
थोरीव सांडिली आपुली परिसें,
नेणे शिवो कैसे लोखंडासी
जगाच्या कल्याण संतांच्या विभूती,
देह कष्टविती उपकारें
भूतांची दया हे भांडवल संतां,
आपुली ममता नाही देही
तुका म्हणे सुख पराविया सुखें,
अमृत हे मुखें स्त्रवतसें.

अभंग तीनमध्ये तुकारामांनी साधू कसा ओळखावा हे सांगितले. त्यासाठी साधू भूतदयेने प्रेरित होऊन प्रत्यक्ष वागतो कसा, ते सांगितले. आता या अभंगात तुकाराम महाराज साधूंची लक्षणे सांगतात. साधू स्वतः मोठा असतो. महात्मा असतो. पण केवळ स्वतः मोठे होणे यात खरे सुख नसते. आपल्यासारखेच सर्वजण मोठे व्हावेत यात खरे शाश्वत सुख असते. तुकाराम महाराज एक दृष्टान्त देऊन हे पटवतात – परीस आणि लोखंड यांचा दृष्टान्त त्यांनी दिला आहे. परीस स्वतः मोठा आहे. लोखंडाचे सोने करण्याचे सामर्थ्य त्याच्या अंगी असते. हीन, क्षुद्र अशा लोखंडाला आपण कसे शिवायचे, अशी शंका, अशी भावना त्याच्या मनात येत नाही. तो आपले मोठेपण (थोरीव) टाकून देतो आणि लोखंडाला स्पर्श करतो. लोखंडाचे सोने होते. लोखंड आता हीन, क्षुद्र राहत नाही. सज्जनाचे, संताचे मोठेपण स्वतः मोठे होण्यात नाही. सर्वांना मोठे करण्यात, सामान्यालाही असामान्य करण्यात त्याचे मोठेपण, संतपण असते.

संसारी, व्यवहारी माणसे स्वतःच्या कल्याणासाठी झटतात. त्यासाठी देह कष्टवतात. संत-सज्जन आपला देह कशासाठी कष्टवतात? जगाच्या कल्याणासाठी! तुकारामांनी या अभंगात हे त्रिवार सांगितले आहे -

(१) 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती'
(२) 'भूतांची दया हे भांडवल संतां'
(३) 'तुका म्हणे सुख पराविया सुखें'

यासाठी संत-सज्जन स्वतःच्या मोठेपणाकडे, शारीरिक-भौतिक सुखाकडे पाहत नाहीत. तुकारामांनी हेही पुन्हा त्रिवार सांगितले आहे--

(१) 'थोरीव सांडिली आपुली....'
(२) 'देह कष्टविती उपकारें'
(३) 'आपुली ममता नाही देही'...

अशा तऱ्हेने संत-सज्जनांच्या वृत्तीत आणि आचारात स्वार्थ नसून परार्थ-परमार्थ असतो, हे तुकारामांनी अन्वय-व्यतिरेकाने सांगितले आहे.

असे हे संत किती मोठे असतात ते सांगायला शब्द पुरे पडत नाहीत. जेव्हा शब्द अपुरे ठरतात तेव्हा मौनच सर्व काही सांगून जाते. तुकाराम म्हणतात –

'काय वाणू आता न पुरे हे वाणी'...

संतांची वाणी ही आपल्यासारखी दिसत असली तरी ती 'अमृत'रूपच असते. ती वाणी ज्यांच्या कानी पडते ते अमृतपान करून सुखी होतात. अशा परमेश्वररूप संतांना सर्व भावे शरण जाणे हाच त्यांच्या भक्तीचा, पूजनाचा मार्ग आहे. तुकाराम महाराज संतांच्या चरणी मस्तक ठेवतात. संत संतांना असे भेटतात; असे ओळखतात, एकरूप होतात.

### स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**(छ) रिकाम्या जागा भरा**

(१) संतांच्या विभूती ......... असतात.

(२) ................ हे संतांचे भांडवल होय.

(३) संतांची आपल्या देही ............. नाही.

(४) संतांचे सुख हे ............ सुखात असते.

(५) संतांच्या मुखातून ............ स्त्रवते.

(६) तुकाराम संतांच्या ............. ठेवतात.

(ज) 'संतवाणी'चे वर्णन तुकारामांनी कोणत्या शब्दात केले आहे?

..........................................................................................................................

..........................................................................................................................

## १.३.५ पाचव्या अभंगाचे अध्ययन

५

आम्ही वैकुंठवासी । आलो याचि कारणासी,
बोलिले जे ऋषि । साच भावे वर्ताया,
झाडु संतांचे मारग । आडरांना भरले जग,
उच्छिष्टाचा भाग । शेष उरले ते सेवू,
अर्थे लोपली पुराणे । नाश केला शब्दज्ञाने,
विषयलोभी मने । साधने बुडविली,
पिटू भक्तीचा डांगोरा कलिकाळासी दरारा,
तुका म्हणे करा, जयजयकार आनंदे.

तुकाराम महाराज या अभंगात आपल्या जीवनाचे, पर्यायाने संतांच्या जीवनाचे कार्य आहे, त्याचा हेतू काय आहे, ते सांगत आहेत. ते म्हणतात –

'पिटू भक्तीचा डांगोरा, कलिकाळासी दरारा'...

ईश्वरनिष्ठेचा, देवभक्तीचा डांगोरा पिटणे, तो प्रचार करणे, लोकांच्या मनावर बिंबवणे हे संतजीवनाचे प्रयोजन आहे. ज्या कलिकाळाला आपण भितो तो कलिकाळ या भक्तीने घाबरतो. भक्ती ही अशी जीवन्मुक्ती देते.

तुकारामांना हे सांगण्याचा अधिकार आहे. तुकाराम स्वतःला, म्हणजे सर्व संतजनांना 'आम्ही वैकुंठवासी' असे म्हणतात. मूळ विष्णुलोकांचे हे रहिवाशी काही विशिष्ट कारणासाठी या इहलोकी अवतरले आहेत. हे कारण कोणते? तुकाराम म्हणतात –

'बोलिले जे ऋषि, सत्य भावे वर्ताया'...

ऋषींनी वेदोपनिषदांतून जे सत्य सांगितले, म्हणजे 'ब्रहम'हे सत्य आहे, ते नित्य आहे, ते आनंदमय आहे.' त्या ब्रहमपदाकडे जाणे हा खरा मार्ग होय. अंधारातून प्रकाशाकडे जाण्याचा हा मार्ग आहे, हे जे ऋषींनी सांगितले ते प्रत्यक्ष आपल्या आचरणात आणण्यासाठी, आणून दाखविण्यासाठी आम्ही 'वैकुंठवासी' या जगात आलो आहोत.

संतांनी हे पूर्वी आचरणात आणून दाखविले आहे. त्यांनी हा मार्ग तयार करून ठेवला होता, पण पुढे हा मार्ग लोपल्यासारखा झाला. तुकाराम म्हणतात –

'झाडु संतांचे मारग ।'

हा लोपत चाललेला मार्ग झाडून स्वच्छ करून सर्वांना दिसेल असा करू, कारण –

'आडरानी भरले जग '..

जगाला हा मार्ग न दिसल्याने, ते रस्ता सोडून, रानात शिरत आहेत. खऱ्या सुखाच्या क्षेत्रात न जाता दैन्य, दुःखाच्या प्रांतात शिरत आहेत. हे असे का घडत आहे? तुकाराम म्हणतात –

(१) 'अर्थे लोपली पुराणे'
(२) 'नाश केला शब्दज्ञाने'
(३) 'विषयलोभी मनें'
(४) 'साधने बुडविली'

मूळ ईश्वराचे स्वरूप सहज कळावे म्हणून कथारूपाने, आख्यानरूपाने सांगावे म्हणून 'पुराणे' लिहिली गेली. पण पुराणांचे खरे मर्म न समजल्याने, त्यांतील अद्‌भुत-चमत्कारांवरच लोक विश्वास ठेवू लागले - त्यातच ते रमले. पुराणे निरूपयोगी ठरली. जे विद्वान पंडित आहेत ते शब्दांच्या अर्थाचा काथ्याकूट करीत राहतात. मूळ सत्यानुभवाकडे जात नाहीत आणि देव-देवतार्चन करणारे लोक विषयांत, म्हणजे भोग्य गोष्टींत त्यांच्या मोहात सापडतात. एकूण परमेश्वर प्राप्तीचे मार्ग, मूळ साधन, जी भक्ती, तिचाच नाश होतो. हा भक्तिमार्ग कसा आहे ते दवंडी पिटून सांगावे म्हणून तुकारामांचा - संतांचा - अवतार होतो.

तुकाराम हे कशाच्या बळावर करू शकतात? ते म्हणतात –

'उच्छिष्टाचा भाग, शेष उरले ते सेवू'

देवाचे, गुरूचे, संतांचे जे उच्छिष्ट, उष्टे ते आम्ही सेवन करू; तो कृपाप्रसाद ग्रहण करताच आम्ही कलिकाळालाही धाक दाखवू; इतके समर्थ होऊ... तुकारामांचे जीवन भक्तीचा जयजयकार करण्यासाठी आहे. ते मोठ्या अधिकाराने, आत्मविश्वासाने, निर्धाराने हा जयजयकार करतात. साधूंच्या रक्षणासाठी आणि दुर्जनांच्या विनाशासाठी देव जसे पृथ्वीवर अवतार घेतात; तसेच संतसज्जन हे सामान्य जनांना संसाराच्या आडरानातून काढून भक्तिमार्गावर आणण्यासाठी अवतार घेतात. संतांचे हे अवतारकार्य या अभंगात अगदी ठाशीवपणे तुकाराम महाराजांनी प्रकट केले आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(छ) 'पिटू भक्तीचा डांगोरा' असे तुकाराम का म्हणतात?

..................................................................................................................

..................................................................................................................

(ञ) संतांचे मार्ग कोणते?

..................................................................................................................

(ट) शब्दज्ञानाचा निषेध ते का करतात?

..................................................................................................................

(ठ) संतसज्जन अवतार का घेतात?

..................................................................................................................

..................................................................................................................

## १.४ नमुना उत्तरे

(क) १. वृक्षवल्ली, वनचरे, पक्षी
    २. मंडप, आसन
    ३. कंथा-कमंडलू

(ख) १. त्यात परवडी विस्तार करीत; म्हणजे कौशल्याने विविध प्रकार करीत.
    २. आपल्या मनातील जे चांगले आहे त्याच्याशी संवाद करीत आणि जे चांगले नाही त्याच्याशी वाद घालीत.
    ३. त्यामुळे अंगाशी गुण-दोष येत नाहीत.

(ग) १. सूर्यविकसिनी नेघे चंद्रकला
    २. पतिव्रता नेणे आणिकांची स्तुती

(घ) दृष्टान्ताची योजना केल्यामुळे भावना किंवा विचार स्पष्ट तर होतोच पण तो मनावर बिंबतो.

(ड़) – संतांच्या ठिकाणी
    – नवनीताप्रमाणे
    – मुलावर जशी दया करायची, तशीच दास आणि दासी यांच्यावरही करायची.
    – संत-महात्मा.

(च) १. साधुजनांचे चित्त लोण्याप्रमाणे मऊ असते.
    २. त्यांचे मन दुःख, दैन्य पाहून द्रवते आणि दुःख दूर करण्यासाठी ते सदैव तत्पर असतात.
    ३. संत परोपकारी असतात.
    ४. संतांच्या जवळ आप-पर भाव नसतो.
    ५. संतांच्या मनात भूतदया वसत असते. ते क्षमाशील असतात.

(छ) जगाच्या कल्याणा, भूतांची दया, ममता;
    परक्याच्या दुसऱ्याच्या; अमृत; चरणीमस्तक.

(ज) संतांची वाणी अमृतरूप आहे. तिच्या श्रवणामुळे मन तृप्त होते.

(झ) कलिकाळांसी दरारा निर्माण करण्यासाठी ते भक्तीचा डांगोरा पिटतात.

(ञ) ब्रह्मपदाकडे नेण्याचा मार्ग हा संतांचा मार्ग

(ट) शब्दज्ञानामुळे सत्याची यथार्थ जाणीव होत नाही. केवळ शब्दांचा काथ्याकूट करण्यात काय मतलब?
(ठ) प्रापंचिकांना आत्मोद्धाराचा मार्ग दाखविण्यासाठी संत अवतार घेतात.

## १.५ अधिक अध्ययन

### १.५.१ तुका झालासे कळस

मध्ययुगीन मराठी कविता (इ.स. ११५०-१८२०) ही प्राधान्याने भक्तिपर कविता आहे. तीतही भागवत संप्रदायाची कविता प्रमाणाने सर्वाधिक आहे. महाराष्ट्रात भागवत-धर्म-मंदिराचा पाया श्री ज्ञानेश्वर महाराजांनी घातला. पुढे नामदेव-एकनाथादी संतांनी त्याचा विस्तार केला. श्री तुकाराम महाराज हे ह्या धर्ममंदिराचे कळस झाले.

पंढरपूर येथील श्री विठ्ठल हे भक्तमंडळाचे आराध्य दैवत. महाराष्ट्रातील या विठ्ठल-संप्रदायाला वारकरी-पंथ म्हणतात. संत श्री नामदेव या पंथाचे प्रवर्तक; श्रेष्ठ प्रचारक. तुकाराम महाराजांना कवित्वाचा संदेश संत नामदेवांनी दिला. श्रीविठ्ठलासह संत नामदेव तुकाराम महाराजांच्या स्वप्नात आले व त्यांनी आपली राहिलेली अभंगरचना पूर्ण करण्याविषयी त्यांस सांगितले. वारकरी-संप्रदायातील कवितेला असा पारंपारिक धागा आहे.

### १.५.२ तुकारामांचा परिचय

तुकारामांचा जन्म, पुण्याजवळील देहू गावी, इ. स. १६०८ मध्ये झाला. प्रारंभी ते सुखी संसारी गृहस्थ होते. ते व्यवसायाने वैश्य होते. त्यांची दुकानदारी उत्तम चालली होती. पण दुष्काळ पडला, पत्नी वारली, मुलगा गेला. इकडे दिवाळे निघाले. तुकाराम विठ्ठलभक्तीकडे वळले. अभंगरचना करू लागले. महान विठ्ठलभक्त झाले. श्रीविठ्ठलाचा त्यांना साक्षात्कार झाला. भक्तिमार्गाचा जयजयकार करीत त्यांनी जगाचा निरोप घेतला. (इ.स. १६५०) फाल्गुन वद्य द्वितीयेला 'तुकाराम बीज' म्हणतात.

तुकारामांनी आपले लौकिक आणि आध्यात्मिक जीवनातले अनुभव आपल्या अभंगांतून व्यक्त केले आहेत. उत्स्फूर्त आणि उत्कट भावोद्रेकाची ही अभंग-कविता म्हणजे मराठी भाषेचे अक्षर-लेणे आहे.

### १.५.३ तुकारामांची शैली : काही विशेष

तुकारामांच्या रचनेत एकसारखी अखंड लय जाणवते, तालबद्धता जाणवते. पुढील चरण घेऊ –

'येणे सुखे रूचे एकांताचा वास,
नाही गुण दोष अंगा येत ...'

येथे दोन दोन अक्षरांचा एकेक घटक होतो व त्यांच्या समकालिक आवर्तनांतून एक ताल-लय यांचा प्रत्यय येतो. पुढील चरण पाहा –

'तैसे माझे मन एक विश्व जाले'

या रचनाविशेषांची आणखी उदाहरणे शोधा व त्यांचा अभ्यास करा.

'आकाश मंडप, पृथिवी आसन' या चरणात दोन घटक आहेत. (१) 'आकाश मंडप' आणि (२) 'पृथिवी आसन' या प्रत्येक घटकात तीन तीन अक्षरांचे दोन दोन शब्द येतात व त्यामुळे त्यांच्यामध्ये एक समतोल साधलेला आहे. आणखी एक उदाहरण पाहा –

'जगाच्या कल्याणा, संतांच्या विभूती...'

तुकारामांच्या रचनेत असा समतोल साधून आलेल्या अन्य रचना शोधून काढा व त्यांचा अभ्यास करा.

**वृक्ष-वल्ली** – हा एक जोड शब्द. वृक्ष आणि वेली यांचे साहचर्य म्हणून एकत्र आलेले हे दोन शब्द एक व्यापक अर्थ व्यक्त करतात. असे आणखी जोड शब्द मिळतात का ते पाहा. त्यांचा अभ्यास करताना पुढील विचारही करा.

या शब्दांमध्ये अंतर्गत अनुप्रासही असतो, त्यामुळे एक प्रकारचे नादसौंदर्य लाभते, ते स्पष्ट करा.

**'वाद', 'संवाद'** – अभंग क्र. १ मध्ये हे शब्द आलेले आहेत. त्यांच्यामध्ये खूपसे ध्वनिसाम्य आहे; खूपसे अर्थसाम्यही आहे. पण त्याबरोबरच ध्वनिभेद आणि अर्थभेदही आहे. हे दोन्ही शब्द जवळजवळ आणून तुकाराम अनुभवभेद कसा व्यक्त करतात, ते जाणून घ्या. तुकारामांच्या अभंगात जागोजाग सुभाषिते येतात. सुभाषितांमध्ये जीवनातल्या अनुभवांचे, विचारांचे सार मोजक्या शब्दांत सुंदरपणे

व्यक्त झालेले असते. उदा.

'मृदु सबाहच नवनीत, तैसे सज्जनांचे चित्त'

तुकारामांच्या अभंगांत आलेल्या एकेका सुभाषितांतील विचारांवर स्पष्टीकरणात्मक परिच्छेद लिहा.

तुकारामांच्या अभंगवाणीतील कितीतरी सुभाषिते मराठी भाषेत 'म्हणी' म्हणून रूढ झालेली आहेत. उदा. –

'नाही निर्मळ जीवन, काय करील साबण?'

अशी जी जी सुभाषिते तुम्हांस आठवतील व आढळतील, ती ती एकत्र करा व त्यांतून तुकारामांचे जीवनाचे अवलोकन व चिंतन, किती व्यापक आणि विविध रूपाचे होते ते जाणून घेण्याचा प्रयत्न करा.

पुढील अभिप्रायाचे मर्म अनुभवास येते का, ते पाहा –

"गारेच्या पोटात जसा हिरा असावा, त्याप्रमाणे वरून बेडौल दिसणाऱ्या तुकारामी रचनेत विलक्षण सरसत्व व मनोहारित्व साठविलेले आहे. तुकाराम बोवांच्या कवितेचे सौंदर्यसर्वस्व जिव्हाळ्यात आहे."

– बाळकृष्ण अनंत भिडे

## १.५.४ अभंग आणि ओवी

ओवी व अभंग हे मराठीतील सर्वांत जुने व परंपरेने चालत आलेले असे लोकप्रिय छंद आहेत. ज्ञानेश्वरांची ओवी व तुकारामांचा अभंग, ही मराठी काव्याची व काव्यरचनेची भूषणे होत. 'अभंगवाणी प्रसिद्ध तुक्याची' असा तुकारामांच्या अभंगगाथेचा गौरव.

तुकारामांच्या अभंगरचनेत चार चरणी मोठा अभंग, तसेच दोन चरणी लहान अभंग. अशा दोन्ही प्रकारांचा आढळ होतो. उदाहरणार्थ अभंग क्र. १ घ्या.

वृक्ष वल्ली आम्हा,
सोयरी वनचरे.
पक्षीही सुस्वरे.
आळवीती'

ही अभंगाची ओळ पाहा. या ओळीत एकूण चार चरण आहेत. पहिल्या तीन चरणात सामान्यतः सहा अक्षरे आहेत आणि चौथ्या चरणात चार अक्षरे आहेत. दुसऱ्या व तिसऱ्या चरणांच्या शेवटी यमक येते. जसे – वन**चरे**... सुस्**वरे**. हा **'मोठा'** अभंग होय. तुम्ही अभ्यासिलेल्या अभंगांतील असे मोठे अभंग कोणते ते शोधा.

आता आपण अभंग क्र. ३ घेऊ –

'जे का रंजले गांजले,
त्यांसि म्हणे जो आपुले'

ही ओळ पाहा. या ओळीत एकूण दोन चरण आहेत. प्रत्येक चरणात आठ अक्षरे आहेत. दोन्हीच चरणात यमक आहे. सामान्यतः अशी रचना जेव्हा असते तेव्हा त्या अभंग रचनेला **'लहान'** अभंग म्हटले जाते. तुम्ही अभ्यासिलेल्या अभंगांतील असे लहान अभंग कोणते ते शोधा.

## १.५.५ गीतांजली आणि तुकारामांचे अभंग

रवीन्द्रनाथ टागोर यांचे 'गीतांजली'तील पुढील गीत वाचा –

Leave this chanting and singing and telling of beads! Whom dost thou worship in this lonely dark corner of a temple with doors all shut? Open thine eyes and see thy God is not before thee!

He is there where the tiller is tilling the hard ground and where the path-maker is breaking stones. He is with them in sun and in shower, and his garment is covered with dust. Put off thy holy mantle and even like him come down on the dusty soil!

Deliverance? Where is this deliverance to be found? Our master himself has joyfully taken upon him the bonds of creation; he is bound with us all forever.

Come out of thy meditations and leave aside thy flowers and incense! What harm is there if thy clothes become tattered and stained? Meet him and stand by him in toil and in sweat of thy brow.

**Rabindranath Tagore**
**('Gitanjali' —** Song-11)

'जे का रंजले गांजले, त्यासि म्हणे जो आपुले,
तोचि साधु ओळखावा, देव तेथेचि जाणावा'
या तुकारामांच्या उद्गाराशी टागोरांच्या या गीतातील भावनाशयाची तुलना करा.

## १.६ सारांश

तुकाराम महाराज गाव सोडून, घरदार सोडून बाहेर डोंगरावर एकान्तात वास करीत आहेत. वृक्ष-वल्ली, पशुपक्षी हीच त्यांची सोयरी झाली आहेत. आकाशाच्या मंडपाखाली पृथ्वीच्या आसनावर ते सुखाने बसले आहेत. हरिकथा हेच नित्याचे भोजन. स्वतःशीच वाद-संवाद करीत ते आनंदात आहेत. येथे अंगी गुण-दोष म्हणून लागत नाही. मन विठ्ठलमय झाले आहे.

विठ्ठलाविना तुकारामांच्या मनात दुसरे कोणी येत नाही. पतिव्रता सर्वभावे पतीलाच स्मरते तसे त्यांचे झाले आहे. हा विठ्ठल देवळातल्या मूर्तीतच असतो असे नाही. रंजलेल्या-गांजलेल्यांना हृदयाशी धरणाऱ्या संतसज्जनांच्या रूपाने तो या पृथ्वीवर वावरतो. संत जगाकडे समदृष्टीने पाहतात. संत म्हणजे प्रत्यक्ष भगवंताची मूर्तीच होत. अशा संतांची थोरवी वर्णन करण्यास वाणी पुरी पडत नाही. संतांना स्वतःविषयी, स्वतःच्या देहाविषयी ममता वाटत नाही. त्यांचं हृदय विश्वकरूणेने भरलेले असते. भूतदया हे संतांचे भांडवल! जगाच्या कल्याणासाठी संत देह कष्टवीत असतात आणि मुखावाटे अमृताचे सिंचन करीत राहतात. अशा "संतांचे आम्ही वारसदार आहोत, आम्ही वैकुंठवासी आहोत, तेथून या पृथ्वीवर आम्ही अवतरलो आहेत", असे तुकाराम महाराज मोठ्या अधिकारवाणीने सांगतात. संतांचा लुप्त होत आलेला भक्तिमार्ग आम्ही झाडून स्वच्छ करून पुन्हा सर्वांसाठी मोकळा करीत आहोत. 'भक्तिमार्गाचा आनंदाने जयजयकार करा', असे तुकाराम महाराज सर्वांना सांगत आहेत.

संत तुकारामांचे भक्तहृदय या अभंगपंचकातून आपणांस पाहण्यास मिळते.

## १.७ सरावासाठी स्वाध्याय

१. खालील विषयावर **निबंध** लिहा
   अ) जनसेवा हीच ईश्वरसेवा
   आ) संत हे मार्गदीपच!

२. थोडक्यात टिपणे करा.
   अ) तकारामांचे एकांतजीवन
   आ) तुकारामांची विठ्ठलभक्ती
   इ) तुकारामांचा जीवनहेत
   ई) तुकारामांचे संतप्रेम

३. खालील उताऱ्याचे भाषांत करा

"I am aware that I am repeating what I have many times stated before and practised to the best of my ability and capacity. What I first stated was itself nothing new. It was as old as the hills. Only I recited no copy-book maxim , but definitely announced what I believed in every fibre of my being. I believe, in what has Muller said years ago, namely. that truth needed to be repeated as long as there were men who disbelieved it."

— Mahatma Gandhi

४. तुकारामांच्या शैलीचे विशेष कोणते त्याची सोदाहरण चर्चा करा.

## १.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. तुकारामांच्या अभंगांची गाथा – महाराष्ट्र शासन प्रकाशन
२. तुकाराम वचनामृत – डॉ. रा. द. रानडे
३. पाच संतकवी – डॉ. शं. गो. तुळपुळे
४. तुकारामांचे चरित्र (पर्वार्ध) – श्री. प. मं. लाड
५. तुकाराम – संपा. गो. गो. टिपणीस (महाराष्ट्र वेद ग्रंथमाला)